लोकमत

# व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या हिवाळी सत्रातील परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी ७८६४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र परीक्षा क्लस्टर महाविद्यालयांतर्फे ऑनलाईन पद्धतीने सुरू झाल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

बी. एस्सी., एम. एस्सी., बी. ए., एमसीए., एम. कॉम., एमएसडब्ल्यू, एम. लिब., एम. कॉम., बी. एस्सी., बी. कॉम., बी. ए., आदी २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील८२२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७८६४ जणांनी शुक्रवारी ऑनलाईन परीक्षा दिली, तर

# सात हजार विद्यार्थ्यांनी दिल्या ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२०) विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा शुक्रवारी पार पडल्या. या परीक्षांसाठी ८ हजार २२६ विद्यार्थी बसले होते. यापैकी ७ हजार ८६४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

शुक्रवारी बी.एस्सी. बायोटेक, आयटी, शुगर टेक, फूड प्रोसेसिंग, कॉम्प्युटर सायन्स, बी.सी.एस., बी.बी.ए., बीएसडबल्यू,एमएसडबल्यू, एम.कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, एमसीए, एमएस्सी नॅनो, एम.ए. या अभ्यासक्रमाच्या परीक्षा पार पडल्या.

# आठ हजार विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील उर्वरित परीक्षा गुरुवारपासून सुरू झाल्या आहेत. शुक्रवारी



८ हजार २२६ विद्यार्थ्यांनी २७ अभ्यासक्रमांची परीक्षा दिली. यापैकी ७ हजार ८६४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने १२ ते १६ एप्रिल या कालावधीतील परीक्षा स्थगित करण्यात आली होती. ही परीक्षा पुन्हा गुरुवार, दि. १५ एप्रिलपासून सुरू झाली. शुक्रवारी बीएससी बायोटेक, बीएससी आयटी, बीएससी शुगर टेक, बीएससी फूड प्रोसेसिंग, बीएससी कॉम्प्युटर सायन्स, बीसीएस, बीबीए, बीसीए, बीएसडब्ल्यू, बीआयडी, बीडीएफसी, बीएफटीएम, बी. व्होक., एम. ए. बीडीएस, बीएससी कॉम्प्युटर सायन्स, एम. लिब., एमएसडब्ल्यू, एम कॉम, मास्टर ऑफ व्हॅल्युएशन एमसीएस (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), एम. ए. भूगोल, एम. एससी. बीएससी या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या.

सकाळ

# ७८६४ विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या परीक्षा गुरुवार (ता. १५) पासून सुरू झाल्या. आज झालेल्या ऑनलाईन परीक्षेसाठी ८२२६ विद्यार्थी नोंदणी केली होती. त्यातील ७८६४ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण विविध माध्यमातून करण्यासाठी विद्यापीठ तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत होती.

सकाळ

# आंबेओहळ, सर्फनालाग्रस्त विवंचनेत

## वास्तवाचे दर्शन; विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाने केला 'सोशल इंपॅक्ट अनॅलिसिस' अहवाल

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : जिल्ह्यातील आंबेओहळ आणि सर्फनाला प्रकल्पांचा 'सोशल इंपॅक्ट ॲनॉलिसिस' अहवाल शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाने केला आहे. प्रत्यक्ष प्रकल्पग्रस्तांच्या गावात जाऊन केलेल्या सर्वेक्षणामुळे पुनर्वसनातील त्रुटी, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आणि त्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती या सर्वच गोष्टींवर प्रकाश पडला आहे. अर्थशास्त्र विभागाच्या अहवालातून या जलसिंचन प्रकल्पांचे यशापयश स्पष्टपणे दिसते.

पाटबंधारे विभागाने शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाला सर्फनाला आणि आंबेओहळ प्रकल्पांचा 'सोशल इंपॅक्ट ॲनॅलिसिस' अहवाल बनवण्यास सांगितले होते. अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एम. एस. देशमुख आणि प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी विद्यार्थ्यांच्या मार्फत अहवाल बनवला. यामध्ये प्रकल्पग्रस्तांची आर्थिक स्थिती, त्यांना उपलब्ध झालेल्या व न झालेल्या सोईसुविधी याचा विस्तृत आढावा घेतला आहे. प्रकल्प रखडल्याने सर्फनाला प्रकल्पाचा खर्च ७२० कोटी तर आंबेओहळ प्रकल्पाचा खर्च २३० कोटींच्या पुढे गेला आहे. याचा काय परिणाम झाला? प्रकल्पाचे लाभक्षेत्र, मर्यादित लाभ या सर्व गोष्टींची मांडणी अहवालातून केली आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचा हा अहवाल दोन्ही प्रकल्पांच्या अभ्यासासाठीचे महत्त्वपूर्ण दस्ताऐवज आहे.

> **आंबेओहळ आणि सर्फनाला प्रकल्पांच्या 'सोशल इंपॅक्ट अनॅलिसिस'साठी प्रत्यक्ष प्रकल्पग्रस्तांशी संवाद साधला. त्यामुळे पुर्नवसनाच्या बाबतीतील त्रुटी प्रकर्षाने समोर आल्या. सर्व्हेक्षण प्रत्यक्ष प्रकल्पग्रस्तांशी भेटून केल्याने अहवालातून वस्तुस्थिती प्रकट होते.**
> – **प्रा. डॉ. एम. एस. देशमुख,** अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

> **दोन्ही प्रकल्प वीस वर्षांहून अधिककाळ प्रलंबित असल्याने त्याचा खर्च काही पटींनी वाढला. प्रकल्प जमिनीवर अधिग्रहणाची टांगती तलवार असल्याने या जमिनीवर कोणत्याही सुधारणा करता आल्या नाहीत. प्रकल्पग्रस्तांच्या दोन पिढ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. शासनाचे प्रकल्पग्रस्तांकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यांचे रखडलेले पुनर्वसन हे देखील प्रकल्प रखडण्याचे प्रमुख कारण आहे.**
> – **प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले,** अर्थशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

### सर्फनाला प्रकल्पग्रस्तांची स्थिती

- पुनर्वसनातील अडचणींमुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असमाधानाची भावना
- सुपीक जमिनीच्या मोबदल्यात मिळालेली जमीन खडकाळ व डोंगर उताराची
- जमीन समतल करण्यापासून, जलवाहिनीचाही खर्च प्रकल्प ग्रस्तांनाच करावा लागणार
- खासगी वनसंपदेचे मूल्यमापन योग्य पद्धतीने झाले नाही.
- पुनर्वसन केलेल्या गावात गायरानाची व्यवस्था नाही
- कायद्याप्रमाणे जमिनीच्या बाजारभावापेक्षा चारपट मोबदला अद्याप नाही

### आंबेओहळ प्रकल्पग्रस्तांची स्थिती

- प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी निश्चित केलेल्या जागेत विहिरींची संख्या कमी. विहीर खोदण्याची आर्थिक क्षमता प्रकल्पग्रस्तांची नाही
- योग्य पुनर्वसन न झाल्याने प्रकल्पग्रस्त रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे गेले.
- मुळचे शेतकरी असरणारे प्रकल्पग्रस्त आता असंघटित क्षेत्रातील कामगार झाले.
- प्रकल्पग्रस्तांकडे शेतीची औजारे नाहीत
- आर्थिकस्थिती बिकट असून बहुतांशी प्रकल्पग्रस्त थकबाकीदार
- अनिश्चिततेमुळे तरुण पिढीची शेतीकडे पाठ

# बाबासाहेबांमुळेच भारताची एकता, अखंडता अबाधित

## - डॉ. विजय खरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताची एकता व अखंडता अबाधित ठेवण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेतील परराष्ट्र व संरक्षणविषयक कलमांद्वारे कुशलतेने केले आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास अधिविभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्रातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय संरक्षणविषयक विचार' विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. खरे म्हणाले, देशाची अंतर्गत व बाह्य सुरक्षा ही राजकीय, सामाजिक व आर्थिक बाजूंनी सर्वसमावेशक असली पाहिजे, याची जाणीव बाबासाहेबांना होती. विकास आणि सुरक्षा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने त्यासंदर्भात भारताने कानाडोळा करणे योग्य नाही. डॉ. आंबेडकर यांच्या राष्ट्रीय सुरक्षाविषयक विचारांकडे देशाने सजगपणाने पाहण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेमध्ये बाबासाहेबांचे योगदान अधोरेखित झाले आहे. याचा अभ्यास करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्रातर्फे विशेष प्रकल्प हाती घेतला जाईल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. अधिष्ठाता तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य हरिष भालेराव, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. के. डी. सोनावणे उपस्थित होते.

लोकमत

न्यूज Inbox

# संयोगिता कटके विद्यापीठात द्वितीय

कोल्हापूर : येथील वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची मार्चमध्ये झालेल्या बी. एड. अभ्यासक्रमाच्या परीक्षा निकाल



१०० टक्के लागला. महाविद्यालयाची विद्यार्थिनी संयोगिता कटके हिने २४०० पैकी २१४४ गुणांची कमाई करीत शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तिच्या गुणांची टक्केवारी ८९.४४ इतकी आहे. ती कुडित्रे (ता. करवीर) येथील रहिवासी आहे. तिला शिक्षणशास्त्र अध्यापक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तानाजी स्वामी, सचिव धनंजय चाफोडीकर, प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांचे यश

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील ज्युनिअर अंडर ऑफिसर प्रिया पांडुरंग बुराण यांना शिवाजी विद्यापीठाचा रणरागिणी ताराराणी बेस्ट अवॉर्ड जाहीर झाला आहे. सार्जंट आकाश पाटील याची भारतीय सैन्यदलातील टेक्निकल पदाकरिता बी ई जी सेंटर, पुणेकरिता निवड झाली आहे. कॅडेट विक्रम वीर याची भारतीय वायुदलात तांत्रिक विभागात निवड झाली आहे